# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५६७/२००७.

श्री. अशोक रामविलास शर्मा,
सतगुरु साई, न्यु स्वस्तिक नगर,
बडनेरा रोड, अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, अमरावती.

श्री. संजय येवले,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद,
ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, अचलपूर,
जिल्हा अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.७.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.७.२००८ रोजी दुपारी १३:२७ वाजता राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.७.२००८ रोजी सुनावणीस असलेल्या त्यांच्या या अपीलाचे संदर्भामध्ये माझ्या पायावर झाडाचे खोड पडल्यामुळे मला व्यवस्थीत चालता येत नाही. डॉ. सल्ल्यानुसार मला ३-४ दिवसाची विश्रांती सांगितली आहे. तरी आपणास विनंती करतो की, मला पुढील तारीख देण्यात यावी असा फॅक्स अर्जदाराने पाठविलेला आहे. परंतु सदरच्या अर्जासोबत डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. उत्तरवादी हजर आहेत व उत्तरवादी पैकी जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हा काल दिनांक १४.७.२००८ रोजी जिल्हा परिषद, अमरावती ग्रामीण पाणी पुरवठा

या कार्यालयात अपीलकर्ता यांना त्यांनी पाहिले होते. त्यांना ३:०० ते ३:३० वाजता त्यांना पाहिले आहे. त्यावेळेस त्यांच्या पायास कोणतीही दुखापत झालेली आहे असे त्यांना जाणवले नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचा मुदतीचा विनंती अर्ज हा नाकारण्यात येत असून अपीलाची सुनावणी घेण्यात येत आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. आनंद दासवन, उप कार्यकारी अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग, अचलपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली होती असे दिसून येते. श्री.संजय येवले, उपविभागीय अभियंता, अचलपूर मी आपणांला रजिस्टर पोष्टद्वारे आर.एल.नं. १४५९, दिनांक २३.९.२००३ (२००३) व आर.एल.नं. १४९३, दिनांक ३.१०.२००३ ला पत्र दिले असता आपण ते रजिस्टर पत्र न घेता व न वाचता Refused करुन परत पाठविले त्याचे कारण काय ? कोणत्या नियमाखाली व कोणत्या अधिकाराचा उपयोग करुन आपण ते पत्र न घेता व न वाचता परत केलेले आहे त्याची माहिती देण्यात यावी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.१२.२००६ रोजी उपविभागीय अभियंता यांनी अपीलकर्ता यांना आपण आपले अर्जात नमुद केलेल्या कालावधीचे अशा प्रकारचे पत्र या कार्यालयास आल्याची व तसे पत्र परत केल्याची कोणतीही नोंद या कार्यालयाचे अभिलेखात नसल्यामुळे सदर बाबत माहिती देणे शक्य नाही. तसेच असे काही घडल्याची बाबही स्मरणात नाही. तसेच आपण अर्जात उल्लेख केलेल्या अधिकाराबाबत/नियमाबाबत मला माहिती नाही असे कळविलेले दिसून येते. त्यावरुन अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे प्रथम अपील दिनांक २२.१२.२००६ रोजी दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ६.२.२००७ रोजी करण्यात आलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता व उत्तरवादी यांनी दिलेला बयान व अपीलकर्ता यांनी सादर केलेली कागदपत्रे याबाबत विचार करता असे दिसून येते की, "अपीलकर्त्यांने दिनांक २३.९.२००३ व दिनांक ३.१०.२००३ रोजी अनुक्रमे आर.एल.नं. १४५९ व आर.एल.नं. १४९३ अन्वये उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग, अचलपूर यांच्या नावे पोच पावती सह रजिस्टर पत्र पाठविले आहे व ही दोन्ही पत्रे दिनांक २६.९.२००३ व दिनांक ७.१०.२००३ रोजी संबंधित कार्यालयाकडून नाकारल्याची नोंद दोन्ही पत्रांवर स्पष्टपणे करण्यात आलेली आहे आणि त्यामुळे हि दोन्ही पत्रे

... ३

न स्विकारल्याचे स्पष्ट होते. वास्तविक पाहता शासकीय कार्यालयाकडे पत्र आल्यानंतर पत्र स्विकारली गेली पाहिजेत व प्राप्त पत्राची अर्जदारास माहिती देणे किंवा पाठविणेसंबंधीत कार्यालयाचे कर्तव्य ठरते. परंतु हया प्रकरणी असे झालेले नाही. त्यामुळे संबंधित उपविभागीय अभियंता यांनी यापुढे भविष्यात अशा घटना घडणार नाही याबाबत दक्ष राहावे व तशा सुचना त्यांनी कार्यालयात सुध्दा द्याव्यात व अपीलकर्त्यास आवश्यकता वाटत असल्यास अपीलकर्त्यांने पुनश्ःच उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा, अचलपूर यांना नव्याने अर्ज करावा किंवा पत्र पाठवावे व आपले प्रलंबित प्रश्नाची तड लावून घ्यावी व उपविभागीय अभियंता, अचलपूर यांनी अपीलकर्ता यांचा अर्ज किंवा पत्र नव्याने प्राप्त झाल्यास ते स्विकारुन संबंधितास माहिती तातडीने उपलब्ध करुन द्यावी किंवा आवश्यक ती कार्यवाही करुन तसे संबंधितास कळविण्यात यावे". असा निर्णय देऊन अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे कार्यकारी अभियंता यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही उपविभागीय अभियंता यांचे विरुध्द केली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००६ च्या अर्जामध्ये ज्या दिनांक २३.९.२००३ व दिनांक ३.१०.२००३ रोजीच्या अनुक्रमे आर.एल.नं. १४५९ व आर.एल.नं.१४९३ या रजिस्टर पत्रास घेण्यास नकार दिल्याचे पत्र व पावत्या दाखल केलेल्या आहेत त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यावर Refused अशा शेऱ्यांची नोंद आहे व त्यामुळेच अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरचे पत्र हे उपविभागीय अभियंता यांनाच पाठविले होते व त्यामुळे त्यांनीच ती Refused केलेले आहे व असे असतांना त्यांनी दिनांक १३.१२.२००६ रोजी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली. वास्तविक सदरचे पत्राचे वर जरी उपविभागीय अभियंता यांना संदर्भीत केले असले तरी ती त्यांनी स्वतः नाकारली आहे अशा प्रकारचा कोणताही शेरा नाही. नाकारण्याचा शेरा पोष्टमन यांनी दिलेला आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२००८ रोजीच्या सुनावणीच्या वेळेस त्यांनी पोष्टमनची साक्ष काढावा याबद्यलचे आदेश त्यांना देण्यात आले होते. कारण शासकीय कार्यालयामध्ये कोणतेही टपाल हे प्रत्यक्ष ज्या अधिकाऱ्यांना संबोधित केलेले असते तेच स्विकारतात व पोच देतात असे नाही. परंतु संबंधित पोष्टमन यांनी तशी साक्ष दिली असती तर त्यातूनच उपविभागीय अभियंता हे दोषी आहेत असा निष्कर्ष काढता आला असता. परंतु अपीलकर्ता यांनी आज

पोष्टमन यास साक्षीस न आणता त्यांच्या पायास दुखापत झाली आहे या कारणावरुन मुदत मागितली आहे. पोष्टमनच्या साक्षीबद्यल कोणताही उल्लेख त्या अर्जामध्ये नाही व त्यामुळे सदरच्या अर्जात वर नमुद केल्याप्रमाणे नाकारण्यात आला. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जी माहिती सार्वजनिक प्राधिकरणामध्ये कागदपत्रे, अभिलेखाचे स्वरुपात उपलब्ध असेल तीच माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. सन २००३ मध्ये अपीलकर्ता यांच्या म्हणण्याप्रमाणे जी पत्रे पाठविलेली आहेत त्या पत्राची नोंद आवक नोंद वहीत असेल तर त्याप्रमाणे उपविभागीय अभियंता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मुद्या राहिला तो अपीलकर्ता यांची पत्रे घेण्याचे कोणत्या अधिकारी किंवा कर्मचारी यांनी नाकारले हया बद्यलचा व हयाबद्यल प्रत्यक्ष ज्यांनी पत्र घेण्यास नाकारलेले आहे त्याची ओळख पटल्याशिवाय कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यास जबाबदार धरता येणार नाही व तशीही ओळख पटल्यास सुध्दा अपीलकर्ता यांचा सन २००३ मधील पत्र हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीच्या अंतर्गत नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगास त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येणार नाही. त्याबद्यल स्वतंत्रपणे तक्रार सक्षम अधिकाऱ्यांकडे करुन त्याबाबत शिस्तभंगाची कार्यवाही त्या संबंधित अधिकाऱ्यांनी करणे हाच पर्याय ठरतो. तसेच अपीलकर्ता यांनी सदरचे पत्र हे Refused करण्याचे कारण काय, कोणत्या नियमाखाली व कोणत्या अधिकाराचा उपयोग करुन आपण ते पत्र न घेता, न वाचता परत करण्यात आले आहे याची माहिती द्यावी ही बाब सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) मध्ये "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही व स्पष्टपणे वर नमुद केल्याप्रमाणे Refused केल्याचा शेरा पोष्टमनचा असल्यामुळे त्याबाबतही कोणत्याही प्रकारची माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या अभिलेखामध्ये किंवा आवक नोंदवही मध्ये देण्याचे कारणही दिसून येत नाही व त्यामुळेच सन २००३ मधील पाठविलेले पत्र कां नाकारण्यात आले याची कारणे सन २००६ मध्ये विचारणे हे विसंगत दिसून येते. वास्तविक त्याच वेळेस अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे स्वतंत्रपणे तक्रार करावयास पाहिजे होती. ती मात्र केलेली दिसून येत नाही व त्यामुळे सदरच्या पत्रामध्ये केलेल्या तक्रारीचे बाबत अपीलकर्ता गंभीर आहे असे दिसून येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी युक्तिवादात सांगितले व त्यामुळेही अपीलकर्ता यांचे म्हणणे हे मान्य करता येण्यासारखे नाही. थोडक्यात अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक २४.११.२००६ च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत म्हणजे दिनांक १३.१२.२००६

... ५

रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये सुध्दा तशाच प्रकारचा निर्णय दिलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे दिनांक १३.१२.२००६ रोजी म्हणजे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १५.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**